
# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

मे - ऑगस्ट २०१८ वर्ष ११ अंक २ पृष्ठ ८ रु. २/-


## तिथे अशी सृजनशीलता असते का...

**स**र्व साधारणपणे जिला सृजनशीलता म्हणतात ती बहुतांशी मानव-निर्मित असते. चित्रकला, संगीत, साहित्य - काल्पनिक व वास्तव दोन्हीही - सर्व प्रकारची वास्तुकला, विलक्षण तंत्रज्ञान, आणि इतर सर्व. जे अशा गोष्टींमध्ये गुंतलेले असतात - चित्रकार, लेखक, कवी, तत्वज्ञानी लेखक, ते बहुतेक करून स्वत:ला सृजनशील समजत असतात. आणि आपण सर्व त्यांच्याशी सहमत असतो. ज्यांना सृजनशील व्यक्ती म्हणतात त्यांच्याबद्दल हीच कल्पना सर्वत्र मान्य आहे. आपल्याला हे मान्य आहे का? मला वाटतं आपण सर्वजण हे पाहतो की सर्व मानवनिर्मित गोष्टी बहुतेक सुंदर असतात. मोठमोठी चर्चेस्, मंदिरं आणि मशिदी, अतिशय सुंदर असतात. त्यापैकी काही तर विलक्षणरित्या विलोभनीय असतात. तुम्ही त्या पाहिल्या असतील की नाही ते मला माहीत नाही आणि जर तुम्ही पाहिल्या असतील तर खरोखरच त्या आश्चर्यकारक आहेत हे तुम्ही पाहिलं असेल. ज्यांनी हे सर्व निर्माण केलं ते अनामिक राहिले. त्या इमारती कोणी बांधल्या हे आपल्याला माहीत नाही. ते गुंतलेले होते फक्त निर्मितीमध्ये, लिहिण्यामध्ये, बायबल आणि अशा सर्व गोष्टींमध्ये - कोणी ती लिहिली ते कोणालाच माहीत नाही. परंतु आता अनामिकता जवळ जवळ गेलेली आहे. अनामिकतेमध्ये कदाचित निराळ्याच प्रकारची सृजनशीलता असते. ती यश, पैसा, आणि 'तीन लाख पुस्तकं दहा वर्षांत खपली' वगैरेवर आधारित नसते. एकदा वक्त्याने स्वत:वर या अनामिकतेचा प्रयोग केला. कारण वक्त्याला हा सर्व भपका आणि निरर्थकता आवडत नव्हती. त्याने पडद्याआडून बोलण्याचा प्रयत्न केला. आणि ते फारच विचित्र दिसलं. (हंशा).

तेव्हा अनामिकतेला खूप महत्त्व आहे. त्यामध्ये एक निराळीच गुणवत्ता असते, अगदी निराळी - तिथे व्यक्तिगत हेतू नसतो, व्यक्तिगत दृष्टीकोन नसतो, व्यक्तिगत मतं नसतात, तिथे मुक्ततेच्या भावनेमधून तुमची कृती होत असते. परंतु आपण म्हणतो ती बहुतेक सृजनशीलता ही मानवनिर्मित असते. म्हणजेच ही निर्मिती ज्ञातामधून होत असते. बरोबर? ज्ञात. महान संगीतकार बेथोव्हन, बाख (Bach) वगैरे वगैरे, ज्ञातामधूनच त्यांची अभिव्यक्ती होत असते. आणि लेखक, तत्वज्ञानी, वगैरे - त्यांनी सुद्धा वाचन केलेलं असतं, माहिती गोळा केलेली असते, स्वत:ची अशी पद्धत त्यांनी विकसित केलेली असते. जे आपल्याकडे साठवलेलं असतं त्यामधूनच नेहमी पुढे जात राहणं, कृती करत राहणं, ज्ञातामधूनच. आणि यालाच आपण सर्वसाधारणपणे सृजनशीलता म्हणतो.

आता ते खरंच सृजनशील असतं का? कृपया, आपण त्या विषयी बोलूया, तिथे अशी काही सृजनशीलता असते का, की जी ज्ञातापासून मुक्त असण्यातून व्यक्त होते? तुम्हाला माझा प्रश्न समजतोय का? कारण जेव्हा आपण चित्र काढतो, लिहितो, एका दगडामधून आश्चर्यकारक शिल्प घडवतो, तेव्हा ते साठवलेलं ज्ञान असतं. मग ते विज्ञानाच्या क्षेत्रातील असो वा मानवी कलेच्या क्षेत्रातील असो, तिथे नेहमीच भूतकाळामधून वर्तमानकाळामध्ये येण्याची प्रवृत्ती असते. किंवा कल्पना, अद्‌भूत, रोमांचकारी विश्व, वास्तव कथा, मनाचा हळवेपणा, दुबळेपणा अशा गोष्टींमधून निर्माण झालेलं असतं, तिथे अशी सृजनशीलता असते का? ज्याला आपण सृजनता म्हणतो त्या अभिव्यक्तीपेक्षा संपूर्णपणे काहीतरी निराळं? तुम्हाला समजतंय का?

आपण विचारत आहोत आणि मला वाटतं, जर तुमची इच्छा असेल तर ह्या महत्वाच्या प्रश्नावर विचार केला गेला पाहिजे. तिथे खरोखरच अशी अभिव्यक्ती असते का, असं जगणं, अशी गती जी ज्ञातापासून आलेली नसते? म्हणजेच जे मन जीवनातल्या गदारोळाने, सर्व सामाजिक, आर्थिक तणावांनी दबलेलं नसेल, ज्याने ज्ञातापासून स्वत:ला मुक्त केलेलं असेल, अशा मनापासून तिथे निर्मिती होते का? आणि नंतर ते मन स्मृतीचा वापर करू शकतं. मी काय म्हणतो आहे ते समजतंय का? ज्ञान-माहिती, परंतु आपण ज्ञातापासून सुरुवात करतो आणि त्यालाच सृजनशीलता म्हणतो. परंतु आम्ही म्हणत आहोत की एक अशी निर्मिती असते जी ज्ञातामधून निपजत नसते. जेव्हा अशी सृजनशील उर्मी किंवा चेतना उदयाला येते, तेव्हा नंतर ती ज्ञाताचा उपयोग करू शकते. परंतु त्याच्या उलट प्रकारे घडत नाही. मी काय म्हणतो आहे ते तुम्हाला समजतंय का, हे मला माहीत नाही.

तुमची जर हरकत नसेल तर कधीतरी प्रयत्न करा, मन ज्ञातापासून मुक्त असण्याचा, किंवा मन कधी ज्ञातापासून मुक्त असू शकेल का ह्याचा शोध घेण्याचा - ज्ञात, जे म्हणजे साठवलेले अनुभव, आठवणी, मिळवलेलं ज्ञान, काही गोष्टींची आपल्यावर पडलेली छाप, इत्यादी. मन ह्या सर्वांपासून मुक्त असू शकेल का? आणि तशा त्या अवस्थेमध्ये, आपल्याला माहीत असलेल्या सृजनाची कदाचित आवश्यकताही नसेल. तुम्हाला समजतंय का? ज्या माणसाकडे लिहिण्याची प्रतिभा आहे त्याला लेखनातून व्यक्त करावंसं वाटतं. तो स्वत:ची अशी लेखनाची एक शैली विकसित करतो, कीट्स, शेली, इलियट आणि इतर, त्यांना लेखनाची उर्मी असते, सृजनाची, परिपूर्ती करण्याची. कदाचित त्यांच्या स्वत:च्या जीवनात काहीही सौंदर्य नसतं...

...मला असं वाटतं की वैज्ञानिक जगतातील सारी निर्मिती, मानवी कलेमधील सृजन, हे नेहमीच एका विशिष्ट गोष्टीपासून असतं, एखाद्या कौशल्यामधून, प्रतिभेमधून, उपजत देणगीमधून आणि त्या प्रतिभेचा अगदी पुरेपूर फायदा करून घेतला जातो. जसा एखादा जन्मत:च संगीताची असामान्य प्रतिभा असलेला संगीतकार, त्याला प्रचंड महत्व प्राप्त होतं. आणि आपण सामान्य माणसं त्याची प्रशंसा करतो आणि आपल्यामध्येही त्यातील थोडेफार गुण असावेत असं आपल्याला वाटतं, आपल्याकडे तशी प्रतिभा नसल्यामुळे आपण त्याच्या मागे

## संपादकीय

**म**नाची सृजनावस्था व उपजत क्षमता ह्या दोन अगदी वेगळ्या गोष्टी आहेत; काही वेळा त्यांच्या अभिव्यक्ती समान असतात. आणि जेव्हा ह्या दोही गोष्टी एकत्र येतात तेव्हा अनुपम सौंदर्याचा अविष्कार असतो.

प्रत्येक मानवामध्ये सृजनशीलता अस्फुटपणे असतेच. विचार, अहं ह्यापासून मुक्त असलेली व्यक्ती सृजनाच्या उबंरठ्यावर असते, शांत, अथांग ऊर्जेने परिपूर्ण अशी स्तब्धता तिथे असते.

क्षमता हे उपजतपणे मिळणारं साधन आहे. कलेच्या माध्यमातून तिचा अविष्कार होतो. परंतु तिच्यावर विचारांचाही प्रभाव पडू शकतो आणि असं घडल्यास विचार तिचा बाजार मांडू शकतो. मग ती प्रसिद्धी, प्रतिष्ठा, पैसा मिळवण्याचं साधन होतं. पण सृजनशीलतेला मात्र अशा गोष्टींचा स्पर्शही होत नाही. उपजत क्षमतेला सरावाची जोड देऊन आपण ती वाढवू शकतो. पण असं जेव्हा होतं तेव्हा बऱ्याच वेळा तिचा वापर करून फायदा करून घेण्याकडे आपला कल झुकतो. मग प्रज्ञा तिच्यापासून दूर जाते. आणि क्षमता ही ज्यांना प्राप्त झाली त्यांची 'मालकी वस्तु' होते. सृजनशीलता ही स्वयंपूर्ण असते, ते साधन नसतं. ती अशी ऊर्जा असते जिथे प्रेम आणि प्रज्ञेचा उगम असतो. तिथे अभिव्यक्तीची आस नसते.

कृष्णमूर्ती म्हणतात, 'ही कृतीशिवायची पूर्ण ऊर्जा असते आणि ती स्तब्ध असते.' ह्या सर्व गोष्टींचं आकलन होण्यासाठी आपण जर स्तब्ध होऊन अतंरंगाचा शोध घेतला, तर कदाचित मंद, शांत, तरल अशा अनुभूतीचा प्रत्यय येऊ शकेल.

---

धावतो, त्याची जवळजवळ पूजाच करतो, तो सगळा चालत असलेला खेळ तुम्हाला माहीत आहे.

आणि ज्याप्रमाणे हा प्रश्नकर्ता विचारत आहे त्याप्रमाणे जेव्हा तुम्ही 'सृजनशीलता म्हणजे काय?' असा प्रश्न विचारता, तेव्हा ते अगदी पूर्णपणे वेगळंच असतं. मला वाटतं की आपल्या सर्वांजवळ ते असू शकतं. विशेषज्ञ नव्हेत, व्यावसायिकरित्या कुशल, प्रतिभावंत, उपजत देणगी असलेले नव्हेत. मला वाटतं की आपल्या सर्वांचंच असं असामान्य मन असू शकेल, जे माणसाने स्वत:च स्वत:वर लादलेल्या, स्वत:च निमार्ण केलेल्या ओझ्यापासून मुक्त असेल. आणि मग त्यातून शहाणं, विवेकी, निरोगी आयुष्य, पूर्णपणे काही आगळंच निर्माण होतं. आणि ते चित्रांमधून, वास्तुकलेतून व्यक्त केलं जाईलच असं नाही. का व्यक्त करावं? तुम्हाला समजतंय का? तुम्ही जर याचा खोलवर शोध घेतला असेल, मला आशा आहे की तुम्ही तसं कराल, तर तुम्हाला समजेल की अजिबात कसालाही अनुभव नसणारी अशी मनाची एक अवस्था असते. कारण अनुभवामध्ये अजूनही धडपडणारं, प्रश्न विचारणारं, काहीतरी मिळवण्याचा प्रयत्न करणारं मन अभिप्रेत असतं. आणि म्हणून ते अजूनही पूर्णपणे अंधारातून बाहेर पडण्यासाठी चाचपडत, झगडत असतं, परंतु ज्या मनामध्ये पूर्णपणे स्पष्टता असते, गोंधळ, संघर्ष नसतो त्याला काही समस्या नसते. तुम्हाला समजतंय का? त्या मनाला समस्या नसते. तुम्ही प्रयत्न करा. अशा मनाला व्यक्त करण्याची, बोलण्याची गरज वाटत नसते – क्षमा करा, मी बोलतो आहे! (हंशा) वक्ता तुम्हाला प्रभावित करण्यासाठी, किंवा तसंच काही निरर्थक करण्यासाठी बोलत नाही, किंवा विशिष्ट दृष्टीकोन, मतं, निर्णय अशा गोष्टींबाबत तुमचं मन वळवण्यासाठी बोलत नाही. अशा दोन व्यक्ती, ज्यांना ह्या प्रचंड गुंतागुंतीच्या, व्यामिश्र जीवनाविषयी कळकळ आहे, ज्यांना ह्या सर्व गोष्टींची संपूर्ण उत्तरं सापडली नाहीत, त्यांच्यामधील हा मैत्रीपूर्ण संवाद आहे. आणि जर आपण मन:पूर्वक ह्याचा वेध घेतला तर तिथे संपूर्ण उत्तर असतं.

तेव्हा मनुष्याने घडवली नाही अशी सृजनशीलता असते. कृपा करून असं म्हणू नका की ती दैवी निर्मिती असते, त्यालाही काही अर्थ नाही. कारण आपलं मन जर विलक्षणरित्या स्पष्ट असेल, त्यावर संघर्षाची पडछायाही नसेल, तर ते मन खरोखर सृजनाच्या अवस्थेत असतं, त्याला अभिव्यक्तीची, परिपूर्तीची, किंवा त्या साऱ्या प्रसिद्धीची, निरर्थक गोष्टींची गरज नसते.

*The Mirror of Relationship: Love, Sex and Chastity,*
ओहाय १९८०, प्रश्नोत्तरे ३

### ही पूर्णत्वाची भावना

**कृष्णमूर्ती :** खऱ्या अर्थानं सृजनशील असणं म्हणजे काय आहे, ह्या प्रश्नावर विचार करणं खूप महत्त्वाचं आहे असं मला वाटतं. कारण सध्या जगात ती एक मोठी समस्या आहे. फक्त एखादी निसर्गदत्त क्षमता असणं किंवा एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील क्षमता असणं ही सृजनशीलता नव्हे. मला वाटतं की, जीवनाकडे समग्रतेने पाहण्याच्या क्षमतेतून सृजनशीलता येते. विचार करताना, भावनांचा अनुभव घेताना, संपूर्णपणे एकात्म असण्यातून सृजनशीलता येते. कदाचित, जिच्यामध्ये विसंगती नाही अशी ही पूर्णत्वाची भावनाच सत्याची अनुभूती असेल – तुम्हाला हवं असेल तर तुम्ही तिला देव किंवा इतर काहीही म्हणा आणि मला वाटतं की जर तुम्ही वास्तव आणि काल्पनिक ह्यातील भेद जाणू शकाल तर तुम्हाला त्या अवस्थेचं आकलन होईल.

राजघाट शाळा, वाराणसी १९५५, व्याख्यान ३

### ती संघर्षाची परिणती आहे

'मी असं करावं' आणि 'मी असं करू नये' या दोन गोष्टींमधील द्वंद्वावर सर्व कृती आधारित असतात आणि अशा प्रकारचा प्रतिकार आणि अशा प्रकारचा संघर्ष ऊर्जा निर्माण करतात; परंतु जर तुम्ही काळजीपूर्वक पाहिलं तर ती ऊर्जा खूप विध्वंसक असते, ती सृजनशील नसते. इथे सृजन ह्या शब्दाचा एक पूर्णपणे वेगळाच अर्थ मला अभिप्रेत आहे; आपल्या पुढील चर्चेतून तो तुम्हाला स्पष्ट होईल. बहुतेक माणसांच्या जीवनात विसंगती असते आणि जर त्यांच्याकडे कलेची उपजत देणगी, प्रतिभा असेल – लेखनाची, चित्रकलेची किंवा इतर काही करण्याची – तर त्या विसंगतीतील तणावामधून त्यांना कलेच्या अभिव्यक्तीची, निर्मितीची, लिहिण्याची ऊर्जा मिळते. जेवढा जास्त तणाव, जास्त संघर्ष तेवढी जास्त निर्मिती आणि त्यालाच आपण सृजन म्हणतो. पण ते सृजन अजिबात नव्हे, ती संघर्षाची परिणती आहे. आपण विसंगतीमध्ये, तणावामध्ये आहोत, ह्या वास्तवाला सामोरे जाण्यात अशी ऊर्जा असेल जी प्रतिकारातून निर्माण झालेली नसेल.

नवी दिल्ली १९६२, जाहीर व्याख्यान ८

# मुंबई विद्यापीठातील चर्चासत्र

मुंबई विद्यापीठातील तत्वज्ञान विभागामध्ये कृष्णमूर्ती फाउंडेशनच्या मुंबई केंद्रातर्फे १९ एप्रिल, २०१८ रोजी एक चर्चासत्र आयोजित करण्यात आलं होतं. श्री. कबीर जयतीर्थ ह्यांनी 'अहं म्हणजे काय, तो कसा घडत जातो?', ह्या विषयावर तेथील विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधला. कबीर हे कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे विश्वस्त असून बंगलोरमध्ये कृष्णमूर्तींच्या जीवन-दृष्टीनुसार शिक्षणाची मांडणी असलेल्या तीन शाळा स्थापन करण्यामध्ये त्यांचा महत्वाची भूमिका आहे. कृष्णमूर्तींची शिकवणूक समजून घेण्यात आणि ती लोकांपर्यंत पोचवण्यात त्यांचे अखंड प्रयत्न असतात.

तत्वज्ञान विभागाच्या प्रमुख श्रीम. गीता रमणा ह्यांनी त्यांच्या स्वागतपर भाषणामध्ये सांगितलं की तेथील विद्यार्थ्यांना कृष्णमूर्तींच्या तत्वज्ञानाचं सूत्रीकरण करणं म्हणजे एक आव्हान वाटतं. ह्या चर्चासत्रातून हे कोडं उलगडण्याची संधी मिळेल अशी आशा त्यांनी प्रदर्शित केली.

सुरुवातीला कबीर म्हणाले की काही वेळ मुख्य विषयावर बोलून मग सर्वांनी एकत्र संवाद करणं, एकत्र चाचपडत शोध घेणं हे विषयवस्तुच्या व्याख्या मांडून ठोस निष्कर्ष काढण्यापेक्षा अधिक समर्पक ठरेल. कृष्णमूर्ती समाजातील प्रचंड अव्यवस्थेकडे आपलं लक्ष वेधतात. ह्या अव्यवस्थेमधील हिंसा, जीवघेणी स्पर्धा, अयाय इ. सर्व समस्यांना मूलत: मानवी जाणीवच कारणीभूत आहे. अव्यवस्था आपल्या बाहेर कुठल्यातरी औद्योगिक किंवा व्यवस्थापकीय यंत्रणेच्या समस्येत नसून ती आपल्या जाणीवेतील एक अतिशय गहन समस्या आहे आणि जोपर्यंत त्या पातळीवर जाऊन आपण त्या समस्येचा ठाव घेत नाही, तोपर्यंत आपण आजाराच्या लक्षणांवरच उपचार करत राहतो, आजाराला समजून घेत नाही.

कृष्णमूर्ती म्हणतात की संपूर्ण मानवी जाणीव ही एकच आहे, परंतु आपलं वागणं त्या वास्तवाच्या अगदी उलट असतं. आपण प्रत्येक जण एक वेगळी व्यक्ती असल्याची भावना आपल्या मनात अगदी खोलवर रुजलेली असते. ह्या संदर्भात उदाहरण देत कबीर म्हणाले की कुठलंही मूल आपण अमुक एक धर्माचे आहोत अशी भावना घेऊन जमाला येत नाही. तरीही वेगवेगळ्या वातावरणात वाढत असताना स्वत:बद्दलच्या तशा व्याख्या आत्मसात केल्या जातात, आणि त्या इतक्या पूर्णपणे आत्मसात होतात की त्याबद्दल मनात काहीही शंका उरत नाही. त्या खोलवर मुळं धरलेल्या व्याख्यांमधूनच आपण आपल्या सभोवतालच्या जगाला प्रतिसाद देत असतो. आणि अशा मानसिक घडणीतून जेव्हा प्रत्येक वेळी प्रतिसाद दिला जातो, तेव्हा ती घडण अधिकाधिक मजबूत होत जाते. प्रत्येक वेळी जेव्हा मी तुम्हाला माझा शत्रू म्हणतो, तेव्हा तुम्ही माझे शत्रू असल्याची भावना अधिक बळकट होते, आणि मग ती भावना माझ्या मानसिक घडणीपासून स्वतंत्र असं एक वास्तव असल्याचं भासवते.

कृष्णमूर्ती सुचवतात की आपला वेगळा अहं असल्याची भावना ही देखील विचाराचीच घडण आहे. इथे कबीरांनी जातीचं उदाहरण दिलं. ते म्हणाले की जात ही विचाराची मांडणी आहे, हे समजणं सोपं आहे. ती भावना आपण बाजूला सारू शकतो. परंतु वेगळा असा अहं असल्याची भावना सतत जागृत असते.

ते पुढे म्हणाले की मुलांमध्ये जमत: वेगळ्या 'अहं'ची भावना नसते. त्यांचे पालक, आजूबाजूची माणसं त्यांच्या बोलण्या-वागण्यातून मुलांमध्ये 'अहं'ची भावना रुजवतात. 'हे तुझं आहे, हे त्या मुलाचं



खेळणं आहे' इ. तेव्हा अगदी बालपणापासून एक वेगळा स्व असण्याचं जणु प्रशिक्षणच मुलांना दिलं जातं. आणि जसजसे आपण मोठे होत जातो, तशीतशी ही अहं ची भावना आपल्या जाणीवेतील निर्विवाद सत्य म्हणून गृहित धरली जाते - एक मूलभूत स्वयंसिद्ध तत्व, ज्यामधून इतर सर्व भावनांचा स्रोत असतो. मग सारं काही 'माझं जीवन, माझ्या भविष्याबद्दलची माझी चिंता,' इ. विचारांभोवती फिरत राहतं. आणि फार क्वचितच एखाद्या मुलाला अशा वातावरणात राहण्याची संधी मिळते, जिथे ह्याबद्दल प्रश्न उपस्थित केले जातात, जिथे एक प्रकारची स्पष्टता असते, विवेक असतो, व्यवस्था असते. उलट आपण मात्र स्व च्या पलिकडे जाण्यासाठी अतिशय कठीण परिश्रमांची गरज असण्याच्या आदर्शाची - म्हणजे भविष्यात दूरवर असलेल्या आदर्शाची कल्पना करतो. त्यामुळे आपला असा एक वेगळा स्व असल्याच्या भावनेला पुष्टी दिली जाते, कारण स्व हा कालसापेक्ष आहे.

'स्व हा कालसापेक्ष आहे' ह्या काहीशा धाडसी विधानाकडे निर्देश करत कबीर म्हणाले की काळ आणि आपला एक वेगळा अहं असल्याची भावना ह्या दोन्ही गोष्टींचं सखोल नातं आहे. कारण 'माझा भूतकाळ, माझा भविष्यकाळ, मी कोणत्या गोष्टींना धरून ठेवण्यात माझं हित आहे' ह्या भावनांबरोबर स्व ची भावना वसत असते. आणि कृष्णमूर्ती म्हणतात (आणि जे अनेकांना संभ्रमात टाकतं) की तुम्ही प्रयत्न करू शकत नाही, कारण ज्या क्षणी तुम्ही प्रयत्न करता, तेव्हा तिथे आधीच असं गृहित असतं की तिथे एक मी आहे ज्याला दुसऱ्या कशावर तरी विजय मिळवायचा आहे, काहीतरी आपल्या काबूत आणायचं आहे. आणि ह्या विभाजनानेच एका वेगळ्या स्व च्या भावनेला पुष्टी मिळते, सातत्य मिळतं. म्हणून, कदाचित ह्या स्व च्या भावनेचा त्याग करण्यामध्ये मूळ अडचण येते ती स्व च्या समस्येची नव्हे, तर आपण त्यासाठी जो मार्ग अनुसरतो त्याची असते. मी काहीतरी साधण्यासाठी जर चुकीचा मार्ग अनुसरत असेन, तर सतत येणाऱ्या विफलतेमुळे मी ती गोष्ट अतिशय कठीण आहे असं मानतो. परंतु आपण अनुसरलेल्या मार्गाबद्दल कधीही प्रश्न उभे करत नाही. आणि सर्व मानवी इतिहासामध्ये जो मार्ग अनुसरला गेला आहे, तो नियंत्रण करण्याचा, श्रद्धा ठेवण्याचा असतो. 'स्व च्या भावनेपासून मुक्त होता येणं शक्य आहे का', हा प्रश्न भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे, उपनिषदांमध्ये आणि अशा अनेक ग्रंथांमध्ये हा प्रश्न उपस्थित केला गेला आहे. परंतु त्या ग्रंथांवरील भाष्यांवरून असं वाटतं की ती एकतर कोणत्यातरी निर्णयाप्रत नेणारी अशी बुद्धीची कसरत आहे, किंवा तिथे मनाला विशिष्ट वळण लावण्यासाठी तथाकथित ध्यानाच्या निरनिराळ्या प्रकारांचं प्रशिक्षण देणं

आहे, किंवा मग तिथे श्रद्धा आणि आशा आहे की एखाद्या दैवी गोष्टीवरील श्रद्धेमुळे किंवा तिच्यामधील भावनिक गुंतवणुकीमुळे स्व च्या भावनेपासून मुक्ती मिळेल.

परंतु, हा प्रश्न समजण्यासाठी प्रथम वेगळ्या स्व ची भावना कशी निर्माण झाली, ह्याचा शोध घेतला पाहिजे. विचारकर्ता हा विचारापासून वेगळा असतो असा एक निश्चित समज आहे. 'मी विचारकर्ता आहे आणि माझ्या मनात विचार येतात', आणि कोणीतरी येतो अणि म्हणतो, 'खरं तर त्याच्या अगदी उलट आहे. विचारांमुळे विचारकर्ता अस्तित्वात येतो.' वेगळ्या पद्धतीने सांगायचं झाल्यास, जर असा विचार असेल की माझा अनुभव हा माझ्यापासून वेगळा आहे, तर तो विचारच मग विचारकर्ता निर्माण करतो, वेगळं असल्याची भावना निर्माण करतो. ह्याचा परिणाम दुर्दैवाने असा होतो की मग मी म्हणतो की मी स्वत:वर ताबा ठेवीन, हे विचार मला अस्वस्थ करत आहेत, मला ते नकोत म्हणून मी त्यांच्यावर ताबा ठेवण्याचा प्रयत्न करतो. पण असा ताबा ठेवल्यामुळे वेगळा अहं असल्याच्या जाणीवेला पुष्टी मिळते.

माणसाचा मेंदू हा वर्तमानाच्या सजीव क्षणापेक्षा भूतकाळाला फार जास्त महत्व देतो. आणि आपलं अस्तित्व भूतकाळामधून कार्यरत असण्यातच आहे असं त्याला वाटत असतं. कदाचित हेच कारण असेल, ज्यामुळे आपण आपले मानवी प्रश्न सोडवू शकत नाही, अशी आर्थिक व्यवस्था स्थापन करू शकत नाही, जिथे काम करणं ही आनंददायक गोष्ट असेल. तेव्हा वेगळ्या अहंची भावना असण्याचे दुष्परिणाम भयंकर आहेत. म्हणून हे पडताळून पाहणं अतिशय महत्वाचं आहे. आणि ह्या शोध घेण्यामध्येच मन मुक्त होण्याची शक्यता आहे.

विचार आणि त्याला मिळणारा प्रतिसाद ह्या दोघांमध्ये न अडकता जेव्हा मनाला त्याचं जागरूकतेने अवधान असतं तेव्हा ते मन मुक्त असतं. अवधान देऊन ऐकणं किंवा पाहणं ह्या कृती विचारावर अवलंबून नसतात.

श्रोत्यांनी वेळोवेळी अनेक प्रश्न उपस्थित केले आणि त्या संवादामधून एकत्र विचारमंथन झालं. दुपारच्या सत्रात प्रथम कृष्णमूर्तींच्या व्याख्यानाची ध्वनीचित्रफीत दाखवण्यात आली.

विचाराच्या समर्पकतेबद्दल बोलताना कबीर म्हणाले की माहितीच्या रुपात विचाराची नक्कीच गरज आहे. परंतु भूतकाळाच्या रुपातील विचार, जो माणसाची वेगळी अशी ओळख निर्माण करतो तोच साऱ्या अव्यवस्थेचं मूळ असतो. विचार हा माहितीचा एक भाग असतो. मला जर इथे बसने यायचं असेल, तर मला त्यासाठी लागणाऱ्या योग्य कृतीची गरज आहे, कुठची बस इथे येईल हे कुणाला तरी विचारणं जरुरीचं आहे. विचाराची अशी कृती निरागस असते. ती मानसिक विभाजन करत नाही. परंतु जेव्हा 'हा माझा अनुभव आहे' असं म्हणत एखाद्या निष्कर्षाशी सारुप्य असतं, तेव्हा तिथे मानसिकरित्या विभाजन आणि वेगळ पाडणं घडून येतं.

कबीर पुढे म्हणाले, विचार ही मेंदूची लक्षात ठेवण्याची क्षमताही असते. स्मृती असणं, त्या पुन्हा आठवणं ही सुद्धा मेंदूची क्षमता आहे. अवधान देणं, ऐकणं ही सुद्धा मेंदूची प्रचंड क्षमता आहे. तुम्ही कोण आहात, काय करता हे काहीही माहीत नसताना मी तुमचं म्हणणं पूर्णपणे ऐकू शकतो. तेव्हा ऐकण्याची कृती, पाहण्याची कृती विचारावर अवलंबून नसते.

'चेतना ही सर्वांमध्ये असते का? जर असली तर ती जागृत असते का, की तिला जागृत करावं लागतं?', ह्या प्रश्नाचं उत्तर देताना कबीर म्हणाले की एका दृष्टीने विचार आणि स्मृतीच्या मनोव्यापारामध्ये एक प्रकारची सामुदायिक जाण दिसून येते. मी पेन हा शब्द वापरू शकतो कारण तुम्हा सगळ्यांना त्या शब्दाचा एकच अर्थ अभिप्रेत असतो. तेव्हा, भाषा, कल्पना ह्यांना सामुदायिक जाण आहे, संस्कारबद्धता ही देखील एक सामुदायिक जाण आहे. लहान मुलामध्ये ऐकण्याची, पाहण्याची, निरीक्षण करण्याची क्षमता दडलेली असते. परंतु, एका दृष्टीने ते मूल काहीशा नाजुक परिस्थितीत असतं. आपण त्याला जे जे काही दाखवू, देऊ ते ते सर्व ते आत्मसात करत असतं. परंतु (आणि शिक्षणाच्या दृष्टीने हा मुद्दा फार महत्वाचा आहे) त्याची पाहण्याची, ऐकण्याची, निरीक्षणाची क्षमता जोपासण्याऐवजी आपण त्या गोष्टींकडे संपूर्ण दुर्लक्ष करतो आणि त्याऐवजी त्याच्या विचार करण्याच्या, निष्कर्ष काढण्याच्या क्षमतेवर भर देतो. त्यामुळे ह्या तरल क्षमता कधीही जोपासल्या जात नाहीत. आणि मग आपण एक मोठी चूक अशी केली आहे की ते काहीतरी गूढ, अगम्य आहे अशी कल्पना करून आपण म्हणतो की थोर ऋषींनाच हे सारं शक्य आहे, घोर परिश्रमांनीच ते प्राप्त होऊ शकतं.

परंतु वस्तुस्थिती अशी नसेलही. सर्व माणसांमध्ये ही निरीक्षणाची, अवधान देण्याची विलक्षण क्षमता असावी. परंतु तुम्ही जर कोणाला ह्याबद्दल सांगितलं तर तो म्हणेल, 'मला ह्या सगळ्यात रस नाही. माझ्या सुखांमध्ये मला रस आहे,' किंवा असंच काही. केवळ पाहणं, निरीक्षण करणं ह्यात त्याला स्वारस्य नसतं. तेव्हा तिथे एक दुष्टचक्र असतं. प्रत्येक प्रतिसाद हा एक वेगळा अहं असल्याच्या भावनेला पोसतो आणि वेगळा अहं असल्याची भावना प्रतिसादांना पुष्टी देते. मन जर सावध असेल, तर हे दुष्टचक्र मोडता येतं.

अवधान देऊन पाहिलंत तर तिथे ममत्व येतं. एखाद्या झाडाकडे आस्थेने लक्ष पुरवलं तर त्या अवधानामध्ये प्रेम सहजपणे असतंच. प्रेम म्हणजे विचार व स्मृतीमधून निर्माण होणारी अशी काही गोष्ट नसते. समग्रतेने पाहण्याच्या आणि ऐकण्याच्या कृतीमध्येच प्रेमाचा गुणधर्म असतो.

जेव्हा मेंदूमध्ये काहीही पकड घेऊन बसत नाही तेव्हा तिथे शिकणं असतं. शिकण्याचं हे मूलतत्व आहे, मग तिथे अतंर्दृष्टी असू शकते. परंतु आपण मुलांना अतंर्दृष्टीसाठी शिक्षण देत नाही, आपण त्यांना निष्कर्ष काढण्याचं शिक्षण देतो आणि त्या निष्कर्षांची परिक्षापत्रामध्ये उजळणी करण्याचं शिक्षण देतो.

केवळ पाहण्याच्या क्रियेमध्ये प्रयत्न नसतो. जेव्हा तुम्हाला कोठेतरी पोचायचं असतं तेव्हा तिथे प्रयत्न असतात. परंतु जेव्हा नुसतं पाहणं असतं तेव्हा तिथे मोकळा वेळ असतो.

सांस्कृतिक स्मृतीबद्दलच्या प्रश्नाला उत्तर देताना कबीर म्हणाले, सांस्कृतिक स्मृतींची गरज आहे का? एखाद्या प्राचीन ग्रंथाची पूजा केल्याने प्रेम, आदर आणि आस्था वाटण्याची संस्कृती येईल का? की मग आपण एकमेकांचं बोलणं नीट ऐकून घेण्यामधून अशी संस्कृती येईल? तुम्ही जेव्हा प्राचीन ग्रंथाचा आदर करता तेव्हा तुम्ही तुमच्या समोर असलेल्या माणसाचा आदर करत नाही. ते भाष्य अधिक महत्वाचं ठरतं. तुमच्या आजुबाजूला तुम्हाला हे दिसून येईल. ही संस्कृती आणि ती संस्कृती असं म्हणत आपण एकमेकांना ठार मारत आहोत. पुढे कबीर म्हणाले, माझं भारतीय संगीतावर, भारतीय संस्कृतीवर प्रेम आहे. परंतु प्रेम आणि ममत्वाची सजीव संस्कृती – ती पुस्तकांमध्ये सापडत नाही.

प्रयत्न करण्याबद्दलच्या प्रश्नाबद्दल कबीर म्हणाले की आपण कोणीतरी खास बनावं ह्या विचारामध्ये प्रयत्न करण्याचं मूळ आहे. विचाराने कोणीतरी बनण्याला फारच महत्व दिलं आहे. 'मला हे व्हायचं आहे, ते व्हायचं आहे, मला हे मिळवायचं आहे'. परंतु हा कोणीतरी

बनण्याचा मनोव्यापार जीवनात खुलेपणा येण्यास अडथळा आणतो. कारण त्यात एका विशिष्ट दिशेने संकुचित क्षेत्रात आपली वाटचाल होते. त्यामुळे समग्र जीवनाकडे पाहणं अशक्य होतं.

माझ्या चिंतेमुळे, माझ्यातील असुरक्षिततेच्या भावनेमुळे मी देवाची कल्पना प्रक्षेपित करतो. त्याच प्रकारे एका विशिष्ट स्थितीप्रत पोचण्याच्या माझ्या आकांक्षेमुळे मी एक निश्चित प्रणाली शोधून काढतो आणि मग त्या प्रणालीतच अडकून पडतो. तेव्हा, कोणीतरी बनण्याची जी भावना असते – जी म्हणजे काही ना काही अनुभवण्याची सततची मागणी असते, आणि त्या अनुभवातून मग आपलं स्वतःचं अस्तित्व प्रमाणित करणं – त्या भावनेची जी वेगळं पाडण्याची, मर्यादा घालणारी गती असते तिचं आकलन होऊ शकेल का?

एक प्रश्न असा विचारला गेला, 'असं नाही का, की एखादा नवखा साधक एखादं ध्येय – कैवल्य, एकात्मता किंवा इतर काही – समोर ठेवून मार्गस्थ होईल, परंतु जसजसा त्याचा प्रवास पुढे जाईल, तसतशा त्याच्या जाणीवेतून कदाचित काही गोष्टी गळून पडतील?'

कबीर उत्तर देताना म्हणाले, इथे फार मोठा फरक आहे. माझी तुमच्यापासून वेगळं असल्याची भावना आणि मला तुमच्याबद्दल खरोखर काय वाटतं, हे तुम्हाला पडताळून पाहता येतं. परंतु एकत्वाचं ध्येय हा विचाराचा तर्क आहे. तेव्हा ध्येयाची संकल्पना करून ते पडताळून न पाहता त्याप्रत जाण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा इथे वास्तविकपणे काय घडतं आहे त्याचं निरीक्षण करणं, ते स्व ला वेगवेगळ्या प्रकारे कशी पुष्टी देतं हे शोधून काढणं, हे अधिक योग्य आहे.

तेव्हा कुठचाही मार्ग निर्माण करण्यामधून कोणीतरी बनण्याची प्रक्रिया सुरू होते, हे समजणं हेच एक मूलगामी पाऊल टाकणं आहे.

माझ्यामधे एक प्रकारची अस्वस्थता आहे. तिचं निरीक्षण करण्याऐवजी मी निरीक्षण करण्याची एक प्रणाली शोधून काढतो. त्या प्रणालीवर मी अवलंबून राहतो, स्वतःचं थेट निरीक्षण करत नाही. ह्यात खचितच विसंगती आहे.

मला जर उत्तराची, निष्कर्षाची अपेक्षा असेल तर ती अपेक्षा हीच एक विशिष्ट विचारधारा असते. कारण मला निष्कर्षाची अपेक्षा असणं हे जरी निरागस भासलं तरीही निष्कर्षामध्ये सुरक्षितता असते असा ठाम समज असण्यातूनच ते येत असतं. त्यामुळे आपण सुरक्षिततेचा शोध घेत असतो, तो सत्याप्रत पोचण्याचा प्रयत्न नसतो.

कुठल्याही मतप्रणालीला धरून ठेवणं, विशेषतः एक वेगळा अहं असल्याची भावना, मग तिथे विचार त्या अहंच्या भावनेचं रक्षण करण्यामध्ये खोलवर गुंतत जातो. तिथे विवेक नसतो. कदाचित विचार फक्त एखाद्या स्वयंसिद्ध तत्वापासून सुरुवात करून पुढे जात असेल, पण त्यात केवळ तुलनात्मक सुसंगती असेल, संपूर्ण सुसंगती नाही.

'कृष्णमूर्ती ज्याबद्दल सांगतात ते निरीक्षण करणं म्हणजे देखील एक विशिष्ट प्रणाली नाही का?', ह्या प्रश्नाबद्दल कबीर म्हणाले, मी बौद्धिक अन्वेषणामधून सुरक्षितता शोधत असेन, किंवा एखाद्या गुरूशी सारुप्य साधून किंवा दुसऱ्या एखाद्या प्रकारे सुरक्षितता शोधत असेन; ते सुरक्षितता शोधणं – त्याचं जर परीक्षण केलं, कुठल्याही पूर्वज्ञानाशिवाय, अशा अवस्थेतून निरीक्षण जिथे काहीही माहीत असल्याची भावना नाही – ज्ञान हे निरीक्षणामध्ये अडथळा आणतं; 'काहीही माहीत नाही' अशा अवस्थेतून जर निरीक्षण होत असेल, तर तिथे काही प्रणाली असते का?

इथे महत्वाचा प्रश्न आहे तो म्हणजे, 'स्व'च्या भावना सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाशिवाय निरीक्षण असू शकतं का? माझं बहुतेक चिंतन, बहुतेक निरीक्षण, माझ्या बहुतेक कृती ह्या एक वेगळा स्व असल्याच्या भावनेला सुरक्षित ठेवण्यामधूनच येतात.

एकंदर ह्या सत्रामध्ये अतिशय मोकळ्या आणि चैतन्यपूर्ण वातावरणात ह्या गहन विषयाच्या विविध पैलूंची उकल झाली.


**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया**, वसंतविहार, १२४, १२६, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८. • दूरध्वनी : ०४४०-२४९३७८०३/२४९३७५९६ • ईमेल : info@kfionline.org • वेबसाईट : www.kfionline.org • कृष्णमूर्तींच्या भाषणांच्या आणि संवादांच्या अनेक डिव्हिडीज् आता आपण ऑर्डर पाठवून मागवू शकता. ही यादी वेबसाईटवर उपलब्ध आहे. • दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारपासून रविवार संध्याकाळपर्यंत निवासी अध्ययन शिबीरे आयोजित केली जातात.

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू :** संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कँपस, १७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बेंगलुरू-५६००६२.
दूरध्वनी : ०८० – २८४३५२४३ • ईमेल : kfistudy@gmail.com • वेबसाईट : www.kfistudy.org
०७-१० जून २०१८ Understanding 'Emotions'- Hurt, Frustration & Anger
१२-१५ जुलै २०१८ What does it mean to be a 'Responsible Parent'?
०९-१४ ऑगस्ट २०१८ Exploring Harmony in Relationship

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ – २४४१२८९ / २४४०३२६ • ईमेल : studycentre@rajghatbesantschool.org • वेबसाईट : www.rajghatbesantschool.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री:** पोस्ट – तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा – पुणे, पिन – ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, ऋषी व्हॅली:** जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश – ५१७३५२
दूरध्वनी : (०८५७१) २६०३७/६८६२२/६८५८२ • ईमेल : study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी:** पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी – २४९१५१. • ईमेल : krc.himalay@gmail.com
दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९० • वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता – ७०००१९.
दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल : kfikolkata@gmail.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक:** ओरिसा, पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक – ७५३००९, ओरिसा.
दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल : kficuttackcentre@gmail.com • वेबसाईट : www.kficc.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर:** आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३. दूरध्वनी : (०२२) २६६००२२४, २४२२३१९९ • ई मेल : jksesbadlapur@gmail.com • वेबसाईट : www.jkses.org

# तिला स्वयं-परिपूर्तीची आस नसते

**आ**पल्या आयुष्यात प्रचंड उलथापालथ होत आहे, तिथे सतत धडपडच सुरू असते, नवीन किंवा सृजनशील असं काही तिथे घडतच नाही. मी ‘सृजनशील’ हा शब्द विचारपूर्वक वापरत आहे. चित्रकार, स्थापत्यविशारद, काष्ठशिल्प घडवणारे कारागीर हे स्वत:ला सृजनशील समजत असतील. एखादी बाई स्वयंपाकघरात सुरेख चपात्या बनवत असेल तर तिलाही सृजनशील म्हटलं जातं आणि लैंगिक कृतीलाही सृजनशील म्हणतात. सृजनशील असणं म्हणजे काय? चित्रकार, संगीतकार आणि ज्यांनी संगीताला वाहून घेतलं आहे असे भारतीय गायक म्हणतात की त्यांची कला ही सृजनशीलतेचा आविष्कार आहे. परंतु असं आहे का? पिकासोला तुम्ही एक महान चित्रकार, अतिशय सृजनशील कलावंत म्हणून स्वीकारलं आहे. तो एक नाक तीन चेहऱ्यांवर लावण्याची करामत करतो किंवा असंच काही करतो. मी नाकारत नाही किंवा मानहानीकारक दृष्टीनेही बोलत नाही, मी फक्त निदर्शनास आणून देत आहे. त्यालाच सृजन-नवनिर्मिती म्हणतात. पण हे सर्व सृजनत्व आहे का? की सृजनशीलता ही वेगळीच गोष्ट आहे? तुम्ही सृजनशीलतेची अभिव्यक्ती चित्र, कविता, गद्य. शिल्प, संगीत ह्यांमध्ये पाहता, ती माणसाच्या निसर्गदत्त क्षमतेप्रमाणे व्यक्त होते. त्याची क्षमता कमीजास्त असू शकते. माणसांनी ती सृजनशीलता म्हणून स्वीकारली आहे, कारण तिच्यामुळे प्रसिद्धी, पैसा, स्थान प्राप्त होतात. परंतु मी विचारतो, ती सृजनशीलता आहे का? ह्या शब्दाच्या अत्यंत गहन अर्थाने ते सृजन आहे का? जोपर्यंत अहंभाव आहे, पैसा, लोकमान्यता हवी आहे, गोष्टी विकाऊ आहेत तोपर्यंत तिथे सृजनत्व आहे का? कृपा करून माझं म्हणणं मान्य करू नका. मी फक्त तुमच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करतो आहे. मला असंही म्हणायचं नाही की मला सृजनशीलता कळते आणि तुम्हाला कळत नाही. मला फक्त म्हणायचं आहे की, आपण ह्या गोष्टी स्वीकारतो, कधीही त्याबद्दल प्रश्न विचारत नाही. मी म्हणतो की एक अशी अवस्था असते जिथे सृजन असतं, त्यात अहंची सावलीही नसते. ती खरी नवनिर्मिती असते, तिला अभिव्यक्तीची गरज नसते, तिला स्वयं-परिपूर्तीची आस नसते, हेच सृजन असतं. कदाचित लैंगिकतेत सृजनत्व आहे असं वाटत असेल आणि ती अतिशय महत्त्वाची गोष्ट झाली आहे. कारण आपल्या भोवतीचं सर्व काही - नोकरी, ऑफिस, चर्चमध्ये जाणं, एखाद्या तत्त्ववेत्त्याला अनुसरणं, एखाद्या गुरूमागे जाणं हे एका परिघात मर्यादित असतं. त्या सर्व गोष्टींनी आपलं स्वातंत्र्य हिरावून घेतलं आहे, आणि त्यात भर म्हणजे आपलं ज्ञान, त्यापासून सुटका नाही, ते भूतकाळ बनून सतत आपल्याबरोबर असतं.

*Questions & Answers,* संवाद ३६

# ती गती म्हणजे सृजन

**प्रश्नकर्ता :** मला मृत्यू, दु:ख आणि ध्यानावस्था ह्यात काहीही परस्पर-संबंध दिसत नाहीत.

**कृष्णमूर्ती :** दु:खाचा संपूर्ण संदर्भ पाहणं - केवळ शाब्दिकरित्या वा बौद्धिकरित्या नव्हे तर तो संदर्भ खोलवर समजून घेणं, आणि आपल्या अंतर्मनाला पोखरणाऱ्या दु:खाच्या दु:सह कृतीपासून मुक्ती मिळणं - यासाठी मन ध्यानावस्थेत असलं पाहिजे. खरा शोध घेणं ही ध्यानावस्था असते. मरणाचा अर्थ समजणं म्हणजे दरदिवशी आपली उपजत प्रतिभा विसर्जित करणं, आपले गुण, आपलं कार्य, आपल्या स्मृती विसर्जित करणं, हा मरणाचा अर्थ समजण्यासाठी विनानिवड अवधान, संपूर्ण सजगता हवी आणि ही विनानिवड अवधानाची अवस्था म्हणजेच ध्यान. दु:खाचा अर्थ समजणं आणि ध्यान ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी नाहीत. कारण दु:ख समजणं ही ध्यानावस्थेची सुरुवात आहे. ध्यानावस्थेत दूरवर पोचण्यासाठी मन सर्व सामाजिक गुंत्यातून बाहेर पडलं पाहिजे. मुक्तावस्थेत काळ व अंतर नसलेली गती असते आणि ती गती म्हणजे सृजन. ध्यानामध्ये ह्या सर्व गोष्टींचा समावेश आहे.

**प्रश्नकर्ता :** ज्या सृजनाच्या गतीबद्दल आपण बोलत आहात ती एखाद्या महान कलाकाराच्या सृजनशीलतेहून वेगळी असते का?

**कृष्णमूर्ती :** हो, खरं तर वेगळीच असते. सृजनाच्या गतीला कोणत्याही अभिव्यक्तीची गरज नाही. ती कुठल्याही तंत्रावर अवलंबून नसते किंवा उपजत देणगीवर वा प्रतिभेवरही अवलंबून नसते. उलट त्या अनंत सृजनासाठी हरएक प्रतिभेचा, हरएक क्षमतेचा अंत होणं आवश्यक आहे. तुम्ही म्हणाल, ‘ज्या सृजनाच्या गतीबद्दल तुम्ही बोलत आहात ती जर कॅनव्हासवर उतरवली नाही, कविता, स्थापत्य, संगीत ह्यांत अभिव्यक्त झाली नाही तर तिचं मोल काय?’ तिला मोल नाही, ती बाजारू वस्तू नाही. तिच्यापासून तुम्ही कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ शकत नाही. ती अनिर्बंध, अमर्याद अशी गोष्ट आहे. मनाला सारखं वाटत असेल की ती सृजनशीलता कृतीमध्ये उतरावी, मन असं स्वप्न पाहत असेल की ती शब्दांमध्ये गुंफली जावी, चित्ररूपाने चौकटीत बसावी, परंतु ते कदापि घडू शकत नाही. कलाकाराच्या आयुष्यात असे काही क्षण येत असतील जेव्हा त्याला आपल्या त्या क्षुद्र अहंपलिकडे काहीतरी जाणवतं; परंतु ती सृजनाची गती नव्हे. जेव्हा अहंचं अस्तित्व पूर्णपणे नाहीसं होतं, तेव्हाच ते अनंत, अमर्याद असू शकतं. मग मन खऱ्या अर्थाने धार्मिक असतं.

सानेन, १९६२, जाहीर व्याख्यान ९

## जे त्या शून्यतेच्या पलिकडे आहे...

तुम्ही जर गंभीरपणे, तळमळीने ह्याचा विचार करू शकलात तर तुम्हाला दिसून येईल की, ह्यात अगदी कशावरही अवलंबून राहणं नसतं - कोणतीही व्यक्ती, कोणतीही श्रद्धा, कोणताही अनुभव, कोणतीही परंपरा - कशावरही नाही. आणि ते, जे त्या शून्यतेच्या पलिकडे आहे, ती सृजनशीलता आहे - वास्तवाची सृजनशीलता आहे. एखाद्या उपजत क्षमतेची सृजनशीलता नव्हे, तर जे भीतीच्या पलिकडे आहे, साऱ्या हव्यासापलिकडे आहे, मनाच्या सर्व चलाखी पलिकडचे आहे, त्याची सृजनशीलता.

ॲम्स्टरडॅम, १९५५, जाहीर व्याख्यान ४

# ही सर्जनशील रिक्तता, ही उत्कट तटस्थता...

निश्चल होण्यासाठी प्रयत्न करणं व निश्चल असणं यामध्ये मोठा फरक आहे. दर दिवशी आपण आपले सर्व अनुभव व जे काही आपण गोळा करतो, तसेच भीती, आपल्या आशा इ. हे आपण विसर्जित केलं पाहिजे. आणि हे त्याच वेळी आपण करू शकतो जेव्हा आपण आपल्या संघर्षाविषयी जागृत असू आणि त्यानंतर तटस्थपणे निश्चल होऊ. आपण दर दिवशी सर्व ऋतू जिवंतपणे जगले पाहिजेत - वसंत ऋतू, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिरातील तटस्थता. हे असे तटस्थपणे जगता आलं पाहिजेत. शिशिरामध्ये शिवारं जशी शांत, पडित असतात, जणु आकाशाकडून पुन्हा ऊर्जा मिळविण्यासाठी त्याच्याकडे आतुरतेने पाहत असतात; तसंच मन-हृदय शांत-स्वागतशील असलं पाहिजे, सर्जनशीलपणे रिक्त असलं पाहिजे. मगच तिथे सत्याचा श्वास घेता येईल.

ही सर्जनशील रिक्तता, ही उत्कट तटस्थता इच्छाशक्तीच्या कृतीमुळे आलेली नसते. ज्यांचं चित्त सतत विचलीत होत असतं, जे अविरतपणे कार्यमग्न असतात, सतत काहीतरी बनण्यासाठी धडपडत असतात, अगदी दक्षतेने तटस्थ राहण्याचा प्रयत्न करत असतात त्यांच्यासाठी हे खूप कठीण असतं. जर तुम्हाला हे समजलं की मन-हृदय शांत असलं पाहिजे, तिथे ग्रहणशील अशी उत्कट संवेदनशीलता असली पाहिजे - त्या आकलनामध्येच मन:शांती असू शकते. हे जे शांत अवधान असतं ते निश्चयाने मिळविलेलं नसतं. ते तेव्हाच येतं जेव्हा विचार-भावना या कोणीतरी बनण्याच्या धडपडीमध्ये सापडलेल्या नसतात. आपण लहान मुलांना शांत राहण्यासाठी प्रयत्न करायला सांगत नाही, परंतु शांत रहा, असं म्हणतो. आपण स्वत:ला सांगतो की, आपण कोणीतरी झालं पाहिजे आणि त्यासाठी आपल्याकडे असंख्य सबबी असतात आणि म्हणून आपण कधीच शांत, निश्चल नसतो. शांत बनण्याचा प्रयत्न करणं म्हणजे शांत असणं असत नाही. फक्त कोणीतरी बनण्याच्या धडपडीचा शेवट होण्यानेच आपण शांत असू शकतो.

उत्कट सृजनतेच्या क्षणी, उदात्त सौंदर्याच्या क्षणी तिथे अपार मन:शांती असते. ह्या क्षणामध्ये 'अहं'चा त्याच्या संपूर्ण संघर्षांसह लोप झालेला असतो. हीच नकारात्मकतेची, विचार-भावनांची उच्चत्तम अवस्था असते. सृजनशील असण्यासाठी अशा अवस्थेची आवश्यकता असते. पण हे क्षण आपल्यासाठी फार क्वचित येत असतात. असे क्षण जिथे विचारकर्ता आणि विचार यांच्या पलिकडे जाणं असतं, असे प्रसंग अनपेक्षितपणे घडून येतात. परंतु तो 'अहं' परत येतोच. आणि एकदा या चैतन्यमय नि:स्तब्धतेचा अनुभव घेतल्यानंतर, विचार-भावना त्याचं स्मृतीमध्ये जतन करतात. अशा प्रकारे सत्याचा पुढील अनुभव येण्यापासून परावृत्त करतात. ही स्मृतीची मशागत करणं म्हणजे प्रयत्नांना चुकीच्या मार्गाने वळवणं असतं. त्यामुळे 'अहं'चं त्याच्या संघर्षासहित, दु:खासहित पुष्टीकरण होत असतं. परंतु जर आपण आपल्या समस्या आणि संघर्ष याविषयी खोलवर जागृत असलो आणि त्यांना समजून घेतलं तर या स्व-बोधाच्या प्रक्रियेमधूनच सावध तटस्थता व मन:शांती उदयाला येते. या चैतन्यमय शांतीमध्येच सत्य असतं. फक्त अत्यंत साधेपणामध्ये, जेव्हा सगळी तृष्णा शांत झालेली असते तेव्हाच तिथे त्या सत्यदर्शनाचा परमानंद असतो.

ओहाय, १९४५, जाहीर व्याख्यान १

# 'स्व'च्या परिपूर्तीची अभिलाषा

**प्रश्नकर्ता :** मी संशोधक आहे. माझ्या हातून अशी अनेक संशोधनं झाली आहेत ज्यांचा उपयोग युद्धामध्ये केला जात आहे. मला वाटतं की माणसांना मारण्याच्या विरुद्ध मी आहे. परंतु माझ्या या संशोधन क्षमतेविषयी मी काय करावं? मी ती क्षमता दडपून टाकू शकत नाही कारण संशोधनाची उर्मी मला ते करण्यास भाग पाडते.

**कृष्णमूर्ती :** कुठची समस्या समजून घेणं अधिक महत्वाचं आणि निकडीचं आहे असं तुम्हाला वाटतं - माणसाला मारण्याचं सामर्थ्य की संशोधन करण्याची क्षमता? जर तुम्हाला संशोधनामध्येच रस असेल, केवळ तुमच्यातील बुद्धीच्या अभिव्यक्तीसाठी, तर मग तुम्ही शोधून काढलं पाहिजे की तुम्ही त्याला इतकं महत्त्व का देता आहात? ही क्षमता तुम्ही वास्तवापासून - जीवनापासून पळवाट काढण्याचं साधन म्हणून नातेसंबधांमध्ये वापरत आहात का? तर मग तुमची ही बुद्धी तुमच्यातील संबंधांमध्ये अडथळा निर्माण करीत नाही का? असणं म्हणजेच संबंधित असणं असतं आणि पूर्ण अलगपणामध्ये कोणतीच गोष्ट राहू शकत नाही. म्हणून स्व-बोधाशिवाय तुमची संशोधनाची क्षमता ही शेजाऱ्यांना अथवा तुम्हाला स्वत:ला धोकादायक ठरू शकते.

तुमचा व्यवसाय तुमच्या सहप्रवाशाला नष्ट करण्यास मदत करतो का? तुमचं संशोधन आणि इतर कार्य हे काही थोड्या काळासाठी उपयोगी ठरत असतील, परंतु ते जर अंतिम विनाशाला कारणीभूत होत असतील, तर मग त्यांचा काय उपयोग आहे? जर या संस्कृतीची परिणती नरसंहारात होत असेल, तर तुमच्या या बुद्धीला काय अर्थ आहे? तुमचं संशोधन करणं, सुधारणा करणं, पुनर्रचना करणं हे सर्व जर माणसाला विनाशाकडे नेत असेल, तर मग ते व्यर्थ आहे. जीवनाच्या व्यापक प्रश्नांकडे दुर्लक्ष करून आणि अंतिम ध्येयाकडे पाठ फिरवून फक्त स्वत:च्या विशिष्ट क्षमतेची परिपूर्ती करण्यामध्येच जर तुम्हाला रस असेल तर तुमची क्षमता निरर्थक आणि निष्फळ आहे. फक्त अंतिम सत्याच्या दृष्टीकोनातूनच तुमच्या क्षमतेला अर्थ प्राप्त होतो.

मला वाटतं की, या प्रश्नामध्ये तुम्हा सर्वांना अगदी मनापासून स्वारस्य नाही. ही देखील तुमची एक समस्या नाही का? तुम्ही कलाकार किंवा सुतार असाल किंवा तुमचा दुसरा कुठचातरी व्यवसाय असेल आणि हा प्रश्न जेवढा एखाद्या संशोधकाला समर्पक असेल, तेवढाच तुम्हालाही लागू असेल. जर तुम्ही एखादा चित्रकार किंवा डॉक्टर असाल तरी तुमचा व्यवसाय किंवा तुमच्या क्षमतेची अभिव्यक्ती याला वास्तवतेचा पाया पाहिजे. नाहीतर ते केवळ स्वत:च्या अभिव्यक्तीचा एक प्रकार बनतो आणि फक्त तुमच्या 'स्व'ची अभिव्यक्ती ही अटळपणे दु:खाकडेच घेऊन जाते. जर तुम्ही स्वत:च्या अभिव्यक्तीकडेच पाहणार असाल तर तुम्ही माणसाच्या संघर्षामध्ये, गोंधळामध्ये आणि द्वेषामध्ये भरच घालत असता. जीवनाचा अर्थ प्रथम शोधल्याशिवाय केवळ स्वत: अभिव्यक्त होणं - मग ते कितीही संतोषदायी असू दे, ते फक्त दु:ख आणि अनर्थच ओढवून घेईल. आपल्या बुद्धीचाच फक्त वापर करण्यापासून सावध राहा. स्व-बोधाच्या सहाय्याने 'स्व'च्या परिपूर्तीच्या हव्यासामध्येच परिवर्तन घडून येतं. परिपूर्तीचा हव्यास निराशा आणि भ्रम निर्माण करतो कारण 'स्व'च्या परिपूर्तीची अभिलाषा अज्ञानामधून उदयाला येते.

ओहाय, १९४५, जाहीर व्याख्यान १

# कृतीशिवायची संपूर्ण ऊर्जा

**म**न जेव्हा मानसिक काळ संपूर्णपणे नाकारतं, तेव्हा तिथे प्रचंड सुव्यवस्था असते. मग मन सहजपणे अशा टप्प्यावर पोहोचतं, जिथे कुठल्याही प्रकारची हालचाल नसते, कारण ते मन स्वत:ला गतीमान किंवा गतीशून्य अशा प्रकारे अनुभवत नसतं. प्रचंड ऊर्जा असल्यामुळे ते शांत असतं व प्रचंडपणे कार्यशील असतं. परंतु काही करण्यासाठी, कशाच्यातरी मागे धावण्यासाठी, काहीतरी बदल घडवण्यासाठी ती कार्यशीलता कार्यरत नसते. त्यात हालचाल नसते, ते मन पूर्णपणे स्तब्ध असतं आणि म्हणून, कार्यशील असल्यामुळे हालचालीशिवाय, गतीशिवाय ऊर्जेने परिपूर्ण असतं. मग काय घडतं? ह्या ऊर्जेने परिपूर्ण असलेल्या स्तब्धतेत, पूर्णपणे स्तब्ध असलेल्या मनात स्फोट होतो आणि हा स्फोट ही काळाच्या वेगळ्या आयामामधली गती असते.

शेवटी सृजन म्हणजे काय? मी लिहिण्याच्या क्षमतेविषयी, चित्र काढण्याच्या, संशोधन करण्याच्या, शोध लावण्याच्या क्षमतेविषयी बोलत नाही. मला तशा प्रकारचं सृजन अजिबात अभिप्रेत नाही.

प्रश्नकर्ता: तुम्हाला अस्तित्व किंवा जगणं म्हणायचं आहे का?

कृष्णमूर्ती: मी विचारलं, ''सृजन म्हणजे काय?'' जवळपास आपण सगळेच जण दुय्यम दर्जाची माणसं आहोत. आपण जे निर्माण करतो, घडवतो, व्यक्त करतो ते सर्व दुय्यम दर्जाचंच असतं. तुम्ही उत्तम चित्रकार असाल, प्रसिद्ध असाल, भरमसाट किंमतीला तुमची चित्र विकत असाल, तर ते सृजन असतं का? ती एका सृजनशील मनाची अभिव्यक्ती असते का? तरीही सर्वांना व्यक्त करायचं असतं. तुमच्याजवळ वेगळी क्षमता असेल तर ती व्यक्त करण्याचा उद्रेक असतो. तुम्ही दुय्यम दर्जाचे लेखक असलात तरीही तुम्हाला स्वत:ला पुढे करायचं असतं. आपल्याला वाटतं की आपण खूप सृजनशील आहोत. पण हे सर्व सृजन नव्हे. आपल्याला सृजन म्हणजे काय हेच माहीत नाही. सृजन ही गोष्ट अशी आहे की ती दरवेळी स्फोटक असतेच. माझं मन केवळ दुय्यम दर्जाचंच आहे असं नाही, तर गेली दोन लक्ष वर्षं जगूनही त्यात काहीही नवीन नाही. जर माझ्यामध्ये एक कलाकार म्हणून प्रतिभा असेल तर मी नवी अभिव्यक्ती शोधतो – हातच नसलेला किंवा एकच डोळ असलेला किंवा असंच काही वास्तवाशी सुसंगत नसलेलं चित्र – वगैरे. परंतु त्यात आंतरिकदृष्ट्या काहीही नवेपणा नसतो. जोपर्यंत मनाला हे कळत नाही तोपर्यंत मनाला नित्यक्रमात, कंटाळत, रेटत, तेच तेच करावं लागतं.

सृजन हे खूप महत्त्वाचं आहे आणि ह्या सृजनात मनाचा विस्फोट होण्यासाठी मन पूर्णपणे शांत असायला हवं, कृतीशिवायची संपूर्ण ऊर्जा. ती म्हणजे उकळत्या पाण्याच्या किटलीप्रमाणे आहे; जर वाफेला बाहेर जायला वाट नसेल तर किटली फुटणार आणि त्यानंतरच तिथे काहीतरी संपूर्णपणे नवीन असतं.

लंडन १९६५, संवाद ५

**कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस्:**

www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.rishivalley.org
www.rajghatbesantschool.org
www.kfistudy.org
www.kscskfi.com
www.jkrishnamurtionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org


**Statement about ownership and other particulars of Antarlahari Newsletter**

**Form IV**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 2. Peridicity of Publication | : | Once in four months, (January, May, September) |
| 3. Printer's Name | : | P. V. Dabholkar |
| Whether citizen of India | : | Yes |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 4. Publisher's Name | : | P. V. Dabholkar |
| Whether citizen of India | | Yes |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 5. Editor's Name | : | Vasanti Padte |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 6. Name and address of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one percent of the total capital | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |

I, P. V. Dabholkar, hereby declare that the particulars given are true to the best of my knowedge and belief.

Sd
(P. V. Dabholkar)


'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.


*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*



*If undelivered please return to :*

**Krishnamurti Foundation India**

Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856  Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org



*Printed and Published by SHRI P V DABHOLKAR on behalf of KRISHNAMURTI FOUNDATION INDIA, MUMBAI EXECUTIVE COMMITTEE, HIMMAT NIWAS, 31, DONGERSEY ROAD, MALABAR HILL, MUMBAI 400 006. Editor : SMT. VASANTI PADTE*
*Printed at INDIA PRINTING WORKS, 42, G. D. AMBEKAR MARG, WADALA, MUMBAI 400 031.*